

॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे



अहिल्यानगर ■ सोमवार, दि. ९ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १२१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

SPOT NEWS

राज्यात लक्ष्मी पूजन; फटाक्यांची आतीषबाजी

● **मुंबई** – राज्यात दिवाळी सणावर दुष्काळाचे सावट असले तरी सर्वत्र दिवाळी उत्साहात साजरी होत असून, आज लक्ष्मी पूजन असल्याने उत्साह, पारंपरिक आनंदाची उधळण आणि सर्वत्र रोषणाईचा झगमगाट पाहायला मिळाला. लक्ष्मी पूजनामुळे दिव्यांच्या प्रकाशमय झगमगाटात सर्व शहरे उजळून निघाले. या निमित्ताने व्यापारी, उद्योजक, छोट्या-मोठ्या व्यावसायिकांनी माता लक्ष्मीचे भक्तिभावाने पूजन करण्यात आले. तसेच घरोघरीही लक्ष्मी पूजन केले आणि फटाक्यांची आतषबाजी आणि दिव्यांची आरास करून दीपोत्सव साजरा केला. संध्याकाळच्या शुभ मुहुर्तावर व्यापारी, दुकानदारांनी पारंपरिक पद्धतीने चोपडा आणि दप्तर पूजन केले. यासोबतच संगणक, गल्ल्याचेही पूजन करीत आगामी वर्ष भरभराटीचे जावो, अशी प्रार्थना लक्ष्मीच्या समोर करण्यात आली. लक्ष्मी पूजनाच्या निमित्ताने घर, दुकानांच्या समोर लक्षवेधी रांगोळ्या काढण्यात आल्या. तसेच दुकानांना झेंडूच्या फुलांचे तोरण, आंब्यांची पाने, केळीचे खूंट लावून सजावट करण्यात आली होती. सुरेख रांगोळ्या आणि रोषणाईने घरांसोबतच बाजारपेठा उजळून निघाल्या. रात्री लक्ष्मी पूजनानंतर फटाक्यांची आतषबाजी करीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. राज्यात सर्वत्र असेच चित्र पाहायला मिळाले.

दहावी, बारावीच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

● **पुणे** – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत (राज्य मंडळ) फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा ६ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते १५ मार्च या दरम्यान होणार आहे. विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक ६ डिसेंबरपासून राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी याबाबतची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. राज्य मंडळाने वेळापत्रक जाहीर केल्यामुळे शिक्षकांना अध्यापनाचे नियोजन, विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करणे शक्य होणार आहे.

दोन्ही 'राष्ट्रवादी' विलीनीकरणाच्या उंबरठ्यावर?

नेत्यांच्या गाठीभेटीने दोन्ही गट पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण

● **मुंबई । वीरभूमी** –

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांचे विलीनीकरण अंतिम टप्प्यात असल्याचा दावा सत्ताधारी महायुतीतील मंत्र्यांकडून करण्यात आला असून माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही पक्षांमधील कटुता संपली असून नुकत्याच झालेल्या गाठीभेटींमुळे दोन्ही गट पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चांना तीव्र उधाण आले आहे.

शरद पवार आजारी असताना ब्रीच कँडी रुग्णालयात प्रफुल्ल पटेल यांनी त्यांची भेट घेतली होती. या भेटीचा एक व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून रुग्णालयात विलीनीकरणासारख्या राजकीय विषयांवर बोलणे योग्य नव्हते, त्यामुळे आम्ही १० नोव्हेंबरनंतर भेटण्याचे ठरवले आहे. मी केवळ साहेबांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी गेलो होतो असे पटेल यांनी म्हटले आहे. दरम्यान सुत्राच्या माहितीनुसार अजित पवार गटामध्ये विलीनीकरणावरून दोन गट पडले असून प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांची मुख्य लीडरशिप विलीनीकरणासाठी उत्सुक





आहे. तर विद्यमान राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांचा सध्यातरी या विलीनीकरणाला विरोध असल्याचे समजते.

यामध्ये शरद पवार गटाची भूमिका महत्वाची ठरणार असून रोहित पवार यांनी आरोप केला आहे की, विलीनीकरणाच्या या वावड्या केवळ सुनेत्रा पवार यांच्यावर दबाव आणण्यासाठी काही नेत्यांकडून उठवल्या जात आहेत. तर जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांनीही सध्या विलीनीकरणाचा कोणताही अधिकृत प्रस्ताव नसल्याचे म्हटले आहे.

दिवाळीच्या मुहूर्तावर, शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी बोलताना मोठा राजकीय बॉम्ब फोडला आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमधील विलीनीकरणाची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. कोणत्या पक्षाचे अस्तित्व कोणामध्ये विलीन होणार, हे लवकरच स्पष्ट होईल आणि सर्व मोठ्या नेत्यांच्या भूमिकाही समोर येतील असे शिरसाट यांनी स्पष्ट केले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर, अजित पवार यांचे सुपुत्र आणि पक्षाचे सरचिटणीस पार्थ पवार यांनी सलग दोन दिवस सिल्व्हर ओक या निवासस्थानी जाऊन शरद पवारांची भेट घेतली व त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. याआधी, अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी ब्रीच कँडी रुग्णालयात शरद पवारांशी तब्बल ९० मिनिटे बंद दाराआड चर्चा केली होती. या भेटीत १० नोव्हेंबरनंतर पुन्हा एकदा सविस्तर बैठक घेण्यावर दोन्ही नेत्यांचे एकमत झाले आहे.

उद्या गुढ उकलणार?

■ पुणे आणि पिंपरी-चिंचवड स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दोन्ही गटांनी एकत्र लढवल्यामुळे कार्यकर्त्यांमधील अंतर आधीच कमी झाले आहे. आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष १० नोव्हेंबरनंतर शरद पवार आणि अजित पवार गटाच्या प्रमुखांमध्ये होणा-या संभाव्य बैठकीवर लागले आहे, ज्यातून राज्याला एक नवा राजकीय भूकंप पाहायला मिळू शकतो.

राज्यात गुलाबी थंडीची चाहूल; पहाटेचा गारवा वाढला

● **मुंबई । वीरभूमी** –

राज्यात आता हळूहळू हिवाळ्याची चाहूल लागली असून, पहाटेच्या वेळी हवेत छान गारवा जाणवू लागला आहे. मात्र, दिवस जसजसा वर येतो, तसतसा उन्हाचा चटका आणि उकाडा देखील जाणवत आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, सध्या राज्यातील तापमानात मोठे चढ-उतार पाहायला मिळत आहेत. पुढील काही दिवसात राज्यात कडाक्याची थंडी पडू शकते.

आज राज्याच्या कमाल आणि किमान तापमानात चढ-उतार होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. पण राज्यामध्ये अनेक भागांत दिवसाचे कमाल तापमान ३४ ते ३७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान नोंदवले जात आहे. कोकणातील रत्नागिरी येथे राज्यातील उच्चांकी ३७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. याशिवाय सांताक्रूझ, अमरावती, डहाणू, सोलापूर, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, अकोला, चंद्रपूर आणि वर्धा या भागांतही तापमान ३५ ते ३६ अंशांच्या पुढे गेले असून उन्हाचा जोर कायम आहे.

यातच राज्याच्या किमान तापमानात घट होत असली तरी अद्यापही गुलाबी थंडीची प्रतीक्षा आहे. सध्या रात्रीच्या आणि पहाटेच्या किमान तापमानात घट होत आहे. नाशिक जिल्ह्यातील निफाड येथील गहू संशोधन केंद्रात राज्यातील नीचांकी १२.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. यामुळे पहाटेच्या वेळी आणि सकाळी हवेत हुळहुळी थंडी आणि छान गारवा अनुभवता येत आहे.

पुढील काही दिवस राज्यात तापमानाचा लपंडाव कायम राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. अरबी समुद्रात दक्षिण केरळच्या किना-यालगत चक्राकार वाऱ्यांची स्थिती तयार झाल्यामुळे हवामानात हे बदल होत आहेत. आज (ता. ८) देखील राज्यात असाच तापमानाचा लपंडाव आणि चढ-उतार कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे

सशस्त्र नक्षलवाद संपला, आता वैचारिक नक्षलवाद्यांशी मुकाबला : मोदी

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –

दरवर्षीप्रमाणे यंदाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या रक्षणकर्त्यांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी पंतप्रधान मोदी छत्तीसगडमधील बस्तर येथे सीआरपीएफच्या जवानांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी पोहोचले. एकेकाळी नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेल्या या भागात त्यांनी जवानांना संबोधित केले. यावेळी त्यांनी विरोधकांवरही निशाणा साधला. काही संघटनांवर वैचारिक नक्षलवाद्यांनी कब्जा केला असून ते देशाच्या संविधान आणि लोकशाहीविरोधात लोकांना भडकवत असल्याचे मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ही पहिली दिवाळी आहे, जेव्हा देशातील प्रत्येक जिल्हा नक्षलवादमुक्त झाला आहे आणि आपण जवानांसोबत दिवाळी साजरी करत आहोत. याचे संपूर्ण श्रेय जवानांच्या बलिदानाला आणि समर्पणाला जाते, असेही त्यांनी सांगितले. क्षलवादाविरोधातील लढाईत सुरक्षादलांनी दिलेल्या बलिदानाचा सन्मान करण्यासाठी आपण त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करत असल्याचे मोदी म्हणाले. मोदी पुढे म्हणाले, आमच्या सरकारने नक्षलवादी आणि फुटीरतावाद्यांच्या आर्थिक रसद पुरवठ्यावर मोठा प्रहार करणारे निर्णय



घेतले. सरकारच्या निर्णयांमुळे बनावट नोटांचे जाळे उद्ध्वस्त झाले आणि नक्षलवादी तसेच फुटीरतावाद्यांची पुरवठा साखळी विस्कळीत झाली. गेल्या ४७ वर्षांत पहिल्यांदाच, मागील एका वर्षात कर्तव्य बजावताना सीआरपीएफच्या एकाही जवानाला प्राण गमवावे लागले नाहीत.

नक्षलवादाविरोधातील लढाई सोपी नव्हती, असेही पंतप्रधानांनी सांगितले. एकेकाळी देशातील जवळपास २० राज्यांमधील २३० हून अधिक जिल्हे नक्षलवादाच्या विळख्यात होते. संध्याकाळ झाली की जनजीवन ठप्प व्हायचे. लोकांना घराबाहेर पडणेही अशक्य व्हायचे. नागरिकांचा मतदानाचा अधिकारही नक्षलवाद्यांनी हिरावून घेतला होता. बिहार, महाराष्ट्र, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडसह देशाचा मोठा भाग डाव्या विचारसरणीच्या उग्रवादाच्या प्रभावाखाली होता. हजारो गावे आणि कोट्यवधी लोकांना वर्षभरात दोन ते तीन हजार नक्षली हल्ल्यांचा सामना करावा लागत होता.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, २०१० मध्ये याच परिसरातील दंतेवाडा येथे नक्षलवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत सीआरपीएफचे ७६ जवान शहीद झाले होते. त्याच वर्षी दंतेवाडा येथे घडलेल्या आणखी एका घटनेत ४४ निष्पाप नागरिकांची हत्या करण्यात आली होती. ही भूमी आपल्या वीरांच्या रक्ताने पावन झाली आहे. मात्र, महालांमध्ये राहणा-या कोणत्याही नामदाराच्या तोंडून दुःखाचा हुंकारही ऐकू आला नाही. त्यांच्या डोळ्यांतून एक अश्रूही आला नाही अशा शब्दांत मोदी यांनी विरोधकांवर टीका केली.

जवानांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, नक्षली हिंसाचाराचा अंत झाला आहे. जंगलांमधील सशस्त्र नक्षलवादी संपले आहेत; मात्र वैचारिक नक्षलवाद्यांनी अनेक संघटनांवर कब्जा केला आहे. आजही ते देशाचे संविधान आणि लोकशाहीविरोधात लोकांना भडकवत आहेत. अनेक राजकीय पक्ष आणि संघटनांमध्ये वैचारिक नक्षलवाद्यांनी घुसखोरी केली आहे. आपल्याला त्यांना ओळखायचे आहे, त्यांचा पराभव करायचा आहे आणि देशाला सुरक्षित ठेवायचे आहे.

भुतारे मंडप डेकोरेशनच्या गोडाऊनला आग

दीड तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात । कोट्यावधींचे नुकसान

● **अहिल्यानगर । वीरभूमी**–

स्टेशन रोडवरील भुतारे मंडप डेकोरेशनच्या गोडाऊनला रविवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास मोठी आग लागली. महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या पथकाने पाच गाड्यांद्वारे पाण्याचा मारा करत दीड तासांच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून गोडाऊन जवळील एका झाडाझुडपात लागलेल्या छोट्या आगीमुळे ही आग लागल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, या आगीत मंडप व डेकोरेशनच्या साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.

रविवारी दुपारी एक ते दीडच्या सुमारास गोडाऊन परिसरातून धुराचे लोट दिसताच नागरिकांनी धाव घेतली. त्यानंतर तत्काळ महापालिकेच्या अग्निशमन विभागाला घटनेची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. छोट्या व मोठ्या गाड्यांद्वारे पाणी मारून दीड तासानंतर आग आटोक्यात आणण्यात पथकाला यश आले. दरम्यान, आगीची धग कायम असल्याने एमआयडीसी व व्हीआरडीईच्या अग्निशमन दलाकडून मदत घेऊन पुन्हा पाण्याचा मारा करण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासनासह आमदार संग्राम जगताप, नगरसेवक मनोज कोतकर, मयूर बांगरे यांनीही घटनास्थळी भेट दिली. दरम्यान, गोडाऊनमध्ये मंडप व डेकोरेशनचे साहित्य असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले होते. सुमारे एक ते दीड किलोमीटर अंतरावरूनही धुराचे लोट दिसत असल्याने नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती. आग नेमकी कशामुळे लागली, याचा शोध घेतला जात आहे.



वीरभूमी

SPOT NEWS

महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मागण्यांसाठी उद्या आंदोलन

● **अकोले । वीरभूमी–**

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संयुक्त कृती समितीतर्फे ५ नोव्हेंबर रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ते उच्च शिक्षण संचालक कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे पुणे विभागीय सदस्य श्री. किशोर धुमाळ यांनी दिली. या आंदोलनाच्या माध्यमातून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित आश्वासित योजनेचे १०, २० आणि ३० वर्षांचे तीन लाभ तात्काळ लागू करणे, विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आठवड्यातून पाच दिवसांचे काम लागू करणे, शिक्षकेतर रिक्त पदे तत्काळ भरणे आणि कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, या मागण्यांसाठी लक्ष वेधले जाणार आहे. या मोर्चात सर्व संघटनांचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष प्रकाश म्हसे, महासचिव रावसाहेब त्रिभुवन तसेच संयुक्त कृती समितीचे प्रमुख अजय देशमुख, किशोर धुमाळ, शिवदत्त बंगाळ यांनी केले आहे.

निमगाव वाघात फटाकेमुक्त दिवाळीची शपथ

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

फटाक्यांचा धूर, ध्वनिप्रदूषण आणि पर्यावरणाची हानी टाळून निसर्गपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देत निमगाव वाघा (ता. नगर) येथे फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली. शहीद जवान गोरख नाना जाधव यांच्या स्मारकस्थळी हा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम उत्साहात पार पडला. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डोंगरे व्यायामशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थ, युवक-युवती आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प केला. सध्या परिसरात दुष्काळाचे सावट असून पाणीटंचाईची समस्या गंभीर बनत आहे. त्यातच वाढते वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. सण-उत्सव साजरे करताना निसर्गाचेही भान ठेवणे काळाची गरज बनली आहे. दिवाळीचा आनंद फटाक्यांच्या आवाजात नव्हे, तर दिव्यांच्या प्रकाशात, आपुलकीत आणि सामाजिक बांधिलकीत शोधला पाहिजे, हा विचार या उपक्रमातून मांडण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी उपस्थित ग्रामस्थांना फटाकेमुक्तीची शपथ दिली. फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच पशुपक्ष्यांना होणारा त्रास टाळण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने दिवाळी साजरी करावी, असे आवाहन करण्यात आले. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश यावेळी देण्यात आला. देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या जवानांच्या स्मृतीला अभिवादन करत समाजाप्रती आणि पर्यावरणाप्रती आपले कर्तव्य जपण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी भाऊसाहेब जाधव, बापू सुंबे, पोपट भगत, रमेश कुलट, राजू डोंगरे, बाळू जाधव, उत्तम निमसे, नवनाथ जाधव, भागचंद जाधव, बापू पुंड, हुसेन शेख, बाबूभाई शेख, अजय फलके, संदीप डोंगरे, किरण ठाणगे, राजू शिंदे, भाऊ होळकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

'स्वच्छ कोपरगाव, सुंदर कोपरगाव' संकल्पनापुर्ततेसाठी नगरपरिषदेचे महत्त्वपूर्ण पाऊल

मा. आ. स्नेहलताताई कोल्हे । कोपरगाव पलिकेच्या अत्याधुनिक स्वीपर मशीनचा शुभारंभ

● **कोपरगाव । वीरभूमी–**



कोपरगाव शहर धुळमुक्त आणि स्वच्छ करण्याच्या दृष्टीने नगर परिषदेने अत्याधुनिक डस्ट कलेक्टर मशीन खरेदी करून महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या आधुनिक मशीनमुळे रस्त्यांवरील धूळ आणि कचरा संकलित करून शहराची स्वच्छता अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. 'स्वच्छ कोपरगाव, सुंदर कोपरगाव' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने नगर परिषदेचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी सांगितले.

कोपरगाव शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी उपलब्ध करण्यात आलेल्या या अत्याधुनिक स्वीपर मशीनचा शुभारंभ गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या हस्ते श्री साईबाबा कॉर्नर येथे करण्यात आला. यावेळी सर्व पदाधिकारी, नगरसेवक आणि शहरवासीयांच्या उपस्थितीत मशीनचे श्रीफळ वाढवून विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर स्वच्छता मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. यावेळी त्या मार्गदर्शन करताना बोलत होत्या.

यापूर्वी कोपरगाव शहरातील रस्त्यांची स्वच्छता पारंपरिक पद्धतीने झाडू मारून केली जात होती. मात्र, त्यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत होती. ही बाब लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला. या स्वीपर मशीनद्वारे शहरातील रस्त्यांवरील धूळ आणि कचरा संकलित केला जाणार असून, स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मदतीने रस्त्यांची नियमित स्वच्छता केली जाणार आहे. त्यामुळे शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला अधिक गती मिळणार असून, धुळमुक्त कोपरगावच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे.यावेळी कोपरगाव शहरात स्वच्छतेचे कर्तव्य बजावणाऱ्या महिला व पुरुष स्वच्छता कर्मचाऱ्यांचा मा. आ. स्नेहलताताई कोल्हे आणि नगराध्यक्ष पराग संधान यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचारी घेत असलेल्या मेहनतीबद्दल यावेळी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

मा. आ. स्नेहलताताई कोल्हे म्हणाल्या की, दिवाळीपूर्वी आपण ज्या पद्धतीने घराची स्वच्छता करतो, त्याचप्रमाणे आपले शहरही स्वच्छ असणे गरजेचे आहे. शहरातील धूळ संकलित करून स्वच्छता राखणे हा या मशीन खरेदीमागील मुख्य उद्देश आहे. नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष तसेच सर्व नगरसेवक-नगरसेविकांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. नागरिकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करून विकासकामांचा लाभ मिळवून देण्यासाठी नगर परिषद प्रशासन सातत्याने कार्यरत आहे. संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे आणि आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपालिका प्रशासनाला आवश्यक ते सहकार्य केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी नगराध्यक्ष पराग संधान म्हणाले की, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे, मा. आ. स्नेहलताताई कोल्हे आणि आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव शहर धुळमुक्त करण्याचा संकल्प पूर्णत्वास जात आहे. नगरपरिषद निवडणुकीत शहरवासीयांना दिलेला शब्द पूर्ण करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. शहरवासीयांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देत शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

याप्रसंगी मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी श्री साई तपोभूमी येथे मनोभावे दर्शन घेतले. तसेच वसुबारसच्या निमित्ताने गोमातेस चारा अर्पण करून आशीर्वाद घेतले. यावेळी नगराध्यक्ष पराग संधान, मुख्याधिकारी अजित निकत, आरोग्य सभापती वैभव आढाव, सर्व नगरसेवक, नगरसेविका, नगर परिषदेचे अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राघोजी भांगरे जयंती महोत्सवाचा ठराव देवगाव ग्रामसभेत मंजूर

● **अकोले । वीरभूमी –**

१८५७ च्या स्वातंत्र्यसमरापूर्वी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र लढा पुकारणारे आद्य क्रांतिकारक राघोजी रामजी भांगरे यांच्या जन्मभूमी देवगाव येथे आयोजित विशेष ग्रामसभेत त्यांच्या कार्याचा गौरव करणारे विविध ऐतिहासिक मागण्यांचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

दरवर्षी ८ नोव्हेंबर रोजी देवगाव येथे राज्यस्तरीय शासकीय जयंती महोत्सव आयोजित करावा. महाराष्ट्र पोलीस दलामार्फत 'गार्ड ऑफ ऑनर' अर्थात शासकीय मानवंदना देण्यात यावी आणि ८ नोव्हेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात सार्वजनिक शासकीय सुट्टी जाहीर करावी, असे ठराव करण्यात आले.

राघोजी भांगरे यांच्या जन्मभूमी देवगाव येथे भव्य राष्ट्रीय स्मारक, प्रेरणाभूमी आणि आदिवासी इतिहासाची माहिती देणारे संग्रहालय उभारण्याची मागणीही करण्यात आली.

लेखक नितीन धोंडे लिखित 'तुफानी वादळ' या ग्रंथाच्या प्रती शासनाने खरेदी करून मोफत वितरित कराव्यात, तसेच राज्यस्तरीय व्याख्यानमाला आयोजित करावी, असा ठरावही मंजूर करण्यात आला.

या ग्रामसभेत ग्राम महसूल अधिकारी रोहिदास जंगले, आदिवासी निरीक्षक परदेशी, ग्रामसेविका अश्विनी डगळे, आरोग्य सेवक अनिकेत सामेरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामसभेत मंजूर झालेले सर्व ठराव अंतिम मंजुरीसाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभाग आणि सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करण्यात येणार आहेत. आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या या मागण्यांना शासनस्तरावर मान्यता मिळणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

पारनेर आगाराकडून प्रवाशांना दिवाळीची मिठाई

एसटी कर्मचाऱ्यांचा आपुलकीचा उपक्रम । प्रवाशांच्या चेहऱ्यावर आनंद

● **पारनेर । वीरभूमी–**



दिवाळीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांशी संवाद वाढवण्यासाठी आणि एसटीच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पारनेर आगाराकडून आज प्रवाशांना मिठाई वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे आगारात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

पारनेर आगार हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी महत्त्वाचे दळणवळणाचे केंद्र आहे. दररोज हजारो प्रवासी शेती, शिक्षण, नोकरी आणि इतर कामांसाठी एसटीचा वापर करतात. सणासुदीच्या काळात प्रवाशांची गर्दी वाढते. त्यांच्या प्रवासाला गोडवा यावा आणि एसटीप्रती आपुलकी वाढावी, या उद्देशाने आगार प्रशासनाने हा सामाजिक उपक्रम राबविला.

आगार प्रमुख आणि लोंढे यांनी सांगितले की, कर्मचाऱ्यांनी ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना स्वतः मिठाईची पाकिटे दिली. आगारातील सूचना फलकावर प्रवाशांसाठीच्या विविध योजनांची माहितीही देण्यात आली आहे. यामध्ये स्मार्ट कार्डसाठी आवश्यक कागदपत्रे, ज्येष्ठ नागरिक सवलत आणि विद्यार्थ्यांसाठीच्या सवलतींची माहिती समाविष्ट आहे. त्यामुळे प्रवाशांना मिठाईसोबत महत्त्वाची माहितीही एकाच ठिकाणी मिळाली.

एसटी कर्मचारी सागर दिवाळीसारख्या सणांमध्ये अनेक प्रवासी कामानिमित्त बाहेर असतात आणि घरी परतत असतात. त्यांच्या प्रवासात थोडा आनंद मिळावा, या उद्देशाने हा छोटासा उपक्रम राबविण्यात आला. यामुळे एसटी आणि प्रवासी यांच्यातील नाते अधिक घट्ट होण्यास मदत होते.

मिठाई वाटपामुळे प्रवाशांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. अनेकांनी आगार प्रशासनाचे आभार मानून या उपक्रमाचे कौतुक केले. सणाच्या गडबडीत एसटीने दाखवलेली ही आपुलकी निश्चितच लक्षात राहणारी आहे.

बाबुजी आव्हाड महाविद्यालयात फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प

कनिष्ठ महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाचा उपक्रम; विद्यार्थ्यांना शपथ

● **पाथर्डी । वीरभूमी–**

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयाच्या एनएसएस विभागामार्फत विद्यार्थ्यांना फटाकेमुक्त दिवाळी अभियानाची शपथ देण्यात आली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दिवाळी हा आनंदाचा, प्रकाशाचा आणि मांगल्याचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. मात्र, फटाक्यांच्या अतिवापरामुळे होणारे वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण मानवी आरोग्य, पर्यावरण तसेच पशुपक्ष्यांच्या जीवनासाठी घातक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक जाणीव रुजविण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड यांनी केले.

महाराष्ट्रात ठिकठिकाणी फटाकेमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षकांकडून फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची प्रतिज्ञा करून घेण्यात आली.

फटाक्यांच्या धुरामुळे हवेची गुणवत्ता खालावते आणि श्वसनविकारांचा त्रास वाढू शकतो. तसेच मोठ्या आवाजामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि पशुपक्ष्यांना त्रास सहन करावा लागतो. या बाबींची जाणीव करून देत सण साजरा करताना पर्यावरण आणि सामाजिक आरोग्याप्रती जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले.

सण-उत्सव साजरे करताना निसर्गाचा समतोल, मानवी आरोग्य आणि प्राणिमात्रांप्रती संवेदनशीलता जपणे आवश्यक आहे. दिवाळीचा खरा आनंद फटाक्यांच्या आवाजात नसून ज्ञानाच्या प्रकाशात, आपुलकीत आणि सामाजिक बांधिलकीत आहे, हा विचार या अभियानातून अधोरेखित करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, पर्यवेक्षक सलीम शेख, प्रा. अरुण नेहूल, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयक प्रा. सुरेखा चेमटे यांनी केले, तर आभार प्रा. सलीम शेख यांनी मानले.



वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमीच्या स्वच्छतेची उपमहापौर धनंजय जाधव यांचेकडून दखल

अहिल्यानगर । वीरभूमी –

शहरातील सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमीच्या दुरवस्थेची दखल घेत उपमहापौर धनंजय जाधव आणि महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून दफनभूमी परिसराची स्वच्छता करण्यात आली. प्रशासनाने घेतलेल्या या सकारात्मक भूमिकेबद्दल अहमदनगर पहिली मंडळी ख्रिस्ती समाजाच्या वतीने उपमहापौर धनंजय जाधव यांचा भव्य सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी ख्रिस्ती समाजाच्या वतीने दफनभूमीच्या सर्वांगीण विकासाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. सिद्धार्थनगर येथील दफनभूमीचे सुशोभीकरण करून परिसरात विद्युत खांबांची व्यवस्था, अंतर्गत रस्त्यांची निर्मिती, सभा हॉल उभारणी तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे उपमहापौर धनंजय जाधव यांच्याकडे करण्यात आली. याप्रसंगी बोलताना उपमहापौर धनंजय जाधव यांनी ख्रिस्ती समाजाच्या विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी पालकमंत्र्यांकडे मोठ्या निधीची मागणी करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच दफनभूमीच्या सुशोभीकरणासाठी आवश्यक त्या विकासकामांचा पाठपुरावा करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. या सत्कारप्रसंगी रेव्हरंड सनी मिसाळ, रेव्हरंड संजय मिसाळ, प्रसाद काळे, शाहुल बनकर, ठोंबरे सर, अमोल काळे, लोकेश बर्वे, नितीन खंडागळे, विजय सतराळकर, राजू देठे, विनीत मकासरे, दीपक साळवे, रमेश भोसले, राजेश उजागरे, पास्टर विजय काकडे, सुनील बनसोडे, विशाल केदारी, राजेश ओहोळ यांच्यासह ख्रिस्ती समाजातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. दफनभूमीच्या स्वच्छतेसाठी महापालिका प्रशासनाने घेतलेल्या पुढाकाराबद्दल ख्रिस्ती समाजाने समाधान व्यक्त केले. मात्र, केवळ स्वच्छतेपुरते मर्यादित न राहता दफनभूमीला आवश्यक मूलभूत सुविधा आणि सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा समाजाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

अंबादास दूध संकलन केंद्राच्या वतीने दूध उत्पादक शेतकऱ्यांना साखरेचे वाटप

अहिल्यानगर । वीरभूमी –

दुष्काळाचे सावट, वाढता आर्थिक ताण आणि शेती व्यवसायातील अडचणी अशा प्रतिकूल परिस्थितीतही शेतकरी आपल्या कष्टाच्या जोरावर दिवाळीचा सण साजरा करत आहेत. अशा परिस्थितीत दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा छोटासा प्रयत्न निमगाव वाघा (ता. नगर) येथील अंबादास दूध संकलन केंद्राच्या वतीने करण्यात आला. दिवाळीनिमित्त दूध उत्पादक शेतकऱ्यांना साखरेचे वाटप करून त्यांच्या सणाचा गोडवा वाढविण्यात आला. जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आदर्श गोपालक पुरस्कार प्राप्त पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते दूध उत्पादक शेतकऱ्यांना साखर वाटप करण्यात आले. दिवाळीच्या सणानिमित्त शेतकऱ्यांच्या कष्टांची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शेतीला जोडधंदा म्हणून अनेक शेतकरी दुग्धव्यवसाय करतात. जनावरांची देखभाल, चारा-पाण्याची व्यवस्था, पशुखाद्याचा वाढता खर्च आणि दुधाच्या दरातील चढ-उतार अशा अनेक आव्हानांना सामोरे जात दूध उत्पादक आपला व्यवसाय टिकवून आहेत. विशेषतः दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता करणे जिकिरीचे ठरत आहे. अशा काळात दूध संकलन केंद्राकडून मिळालेली साखरेची भेट शेतकऱ्यांसाठी आनंददायी ठरली.

अकोलेच्या आदिवासींची दिवाळी वाघबारसेने सुरु!

निसर्गपूजा, नवसपूर्ती आणि पारंपरिक प्रथांचा अनोखा संगम । पूर्वापार संस्कृतीचे जतन

अकोले । वीरभूमी–





दिवाळी म्हटले की डोळ्यांसमोर येतात पणत्यांची रोषणाई, फराळ, फटाके आणि लक्ष्मीपूजन. मात्र, सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यांत वसलेल्या अकोले तालुक्यातील आदिवासी बांधवांची दिवाळी वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण असते. येथे दिवाळीची सुरुवात वाघबारसेने होते. वाघदेवतेची पूजा, नवीन पिकांचे अर्पण, पारंपरिक वाद्यांचा गजर आणि सामूहिक उत्सव अशा अनोख्या परंपरांतून आदिवासी समाज आजही आपली संस्कृती जपत आहे.

अकोले तालुक्यातील पाचनई, पेठ्याची वाडी, कुमशेत, जानेवाडी, आंबीत, शिरपुंजे, रतनवाडी, घाटघर, खिरविरे, शेणीत आदी आदिवासी भागांत वाघबारस साजरी करण्याची जुनी परंपरा आहे. या दिवशी ग्रामस्थ, गुराखी आणि वडीलधारी मंडळी एकत्र येऊन गावाच्या सीमेवरील वाघदेवतेच्या ठिकाणी पूजा करतात.

आदिवासी समाजात वाघदेवतेच्या पूजेला विशेष महत्त्व आहे. जंगलातील हिंस्र प्राण्यांपासून गावातील माणसे आणि पाळीव जनावरांचे रक्षण व्हावे, चांगले पीक यावे आणि कुटुंबात सुख-समृद्धी नांदावी, यासाठी वाघोबाला साकडे घातले जाते. अनेक कुटुंबांकडून वर्षभरात केलेले नवस या दिवशी पूर्ण केले जातात. नारळ, शेंदूर आणि पारंपरिक नैवेद्य अर्पण करून वाघदेवतेची आराधना केली जाते.

आदिवासी समाजाची दिवाळी शेती आणि निसर्गाशी घट्ट जोडलेली आहे. पावसाळ्यानंतर शेतात आलेले नवीन भात, नागली, वरई, उडीद आदी पिकांची कणसे वाघदेवतेला अर्पण केली जातात. निसर्गाने दिलेल्या अन्नधान्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची ही परंपरा आहे. नवीन धान्याची पूजा केल्यानंतरच त्याचा वापर करण्याला काही ठिकाणी विशेष महत्त्व दिले जाते.

वाघबारसेच्या निमित्ताने आदिवासी बांधव पारंपरिक वेशभूषा परिधान करून एकत्र येतात. पारंपरिक वाद्यांचा गजर, मिरवणूक, लोकगीते आणि नृत्यांतून सणाचा आनंद व्यक्त केला जातो. गावोगावी एकत्र येऊन साजरा होणारा हा उत्सव सामाजिक एकोपा आणि बंधुभाव अधिक दृढ करतो.

आजच्या आधुनिक युगात दिवाळी साजरी करण्याच्या पद्धतीत मोठे बदल झाले असले, तरी अकोले तालुक्यातील आदिवासी बांधवांनी पूर्वजांकडून चालत आलेल्या परंपरा जपल्या आहेत. वाघदेवतेवरील श्रद्धा, शेतीशी असलेले नाते, निसर्गाप्रती कृतज्ञता आणि सामूहिक जीवनपद्धती यांचे दर्शन त्यांच्या दिवाळीतून घडते.

एकंदरीत, अकोले तालुक्यातील आदिवासी समाजाची दिवाळी हा केवळ दिव्यांचा आणि आनंदाचा सण नसून निसर्ग, वन्यजीव, शेती आणि संस्कृती यांच्याशी असलेले अतूट नाते जपणारा आगळावेगळा सांस्कृतिक उत्सव आहे.

माणुसकीच्या भावनेतून डांगेवाडीत गरजूंना फराळ, नवीन कपडे व किराणा साहित्याचे वाटप



पाथर्डी । वीरभूमी –

यंदाच्या भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. हाताला काम नाही, उत्पन्नाचे साधन मर्यादित आणि दुसरीकडे जनावरांच्या चारा-पाण्याची चिंता, अशा दुहेरी संकटात ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना दिवाळीसारखा सणही आनंदाने साजरा करणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यासाठी आणि त्यांना मानसिक आधार देण्यासाठी डांगेवाडी येथे माणुसकी जपणारा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

आमदार मोनिकाताई राजळे यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली डांगेवाडीचे सरपंच सोमनाथ अकोलकर यांच्या संयोजनातून गावातील गरजू वृद्ध कुटुंबांना दिवाळीनिमित्त फराळ, नवीन कपडे तसेच आवश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. सणाच्या आनंदापासून वंचित राहू नये, या सामाजिक जाणिवेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला. यावेळी भाऊसाहेब चितळे, विष्णुपंत डांगे, आजिनाथ डांगे, शरद डांगे, शहादेव सुरासे, बापू टकले, समाधान डांगे, सचिन अकोलकर, आजिनाथ चितळे, भैय्या चितळे, अमोल डांगे तसेच सिंहगर्जना प्रतिष्ठानचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी सात नंबर पाणी मागणी अर्ज दाखल करावे : आ.आशुतोष काळे

कोपरगाव । वीरभूमी–



गोदावरी कालव्याच्या लाभधारक क्षेत्रातील शेतकऱ्यांना रब्बी हंगाम सन २०२६-२७ करीता पाटबंधारे विभागाकडून अधिकृत जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात आले आहे. सध्याची दुष्काळी परिस्थिती व पाण्याची वाढती नितांत गरज लक्षात घेता कालव्याच्या आवर्तनाचे योग्य आणि अचूक नियोजन होणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी गोदावरी डावा व उजव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील लाभधारक शेतकऱ्यांनी सात नंबर पाणी मागणी अर्ज लवकरात लवकर पाटबंधारे विभागाकडे दाखल करावे असे आवाहन आमदार आशुतोष काळे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे शेतकऱ्यांना केले आहे.

प्रसिद्धी पत्रकात आ.आशुतोष काळे यांनी असे म्हटले आहे की, कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ठरल्या प्रमाणे गोदावरी कालवा लाभक्षेत्रातील दुष्काळाची परिस्थिती विचारात घेऊन जलसंपदा विभागाने रब्बी हंगामातील सिंचनाचे नियोजन केले आहे. या नियोजनानुसार सर्व प्रकारची हंगामी भुसार पिके, फळबागा तसेच बारमाही उभ्या पिकांना पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. लाभ क्षेत्रातील पिकांना हंगामाच्या अखेरपर्यंत सुरळीत व वेळेवर पाणी मिळण्यासाठी लाभधारका शेतकऱ्यांनी ७ नंबर पाणी मागणी अर्ज २० नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत पाटबंधारे विभागाच्या संबंधित सिंचन शाखा कार्यालयात जमा करावे.

शेतकऱ्यांनी पाणी मागणी अर्ज वेळेत जमा केल्यास पाटबंधारे विभागाला उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन सर्व लाभधारकांसाठी आवर्तनांचे योग्य वाटप करता येणार आहे. दुष्काळी परीस्थितीत रब्बी पिकांचे कोणतेही नुकसान होऊ नये आणि उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब काटकसरीने वापरणे गरजेचे आहे.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून गोदावरी डावा व उजव्या कालव्याच्या जास्तीत जास्त लाभधारक शेतकऱ्यांनी विलंब न करता मुदतीच्या आत आपले नमुना ७ अर्ज जमा करावे असे आवाहन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.

एकल महिलांच्या मुलांची दिवाळी अहिल्या समितीने केली गोड

अकोल्यात १२५ मुलांना पसंतीचे कपडे भेट । वंचितांच्या जीवनात आनंद निर्माण करणारा उपक्रम

अकोले । वीरभूमी–



एकीकडे प्रत्येकजण आपल्या कुटुंबाची दिवाळी गोड करण्यासाठी व्यस्त असताना, दुसरीकडे वंचित आणि एकल महिलांच्या मुलांच्या आयुष्यातील अंधार दूर करण्यासाठी अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समिती धडपडत आहे. या समितीने यंदाच्या दिवाळीत मुलांच्या आयुष्यात गोडवा निर्माण केला असून, असे चित्र समाजात क्वचितच पाहायला मिळते, असे अकोले तालुका शिवसेना प्रमुख सुशांत गजे यांनी सांगितले.

श्री समर्थ सेवा ट्रस्ट अंतर्गत रविवारची शाळा आणि अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समिती यांच्या माध्यमातून अकोल्यातील एकल महिलांच्या मुलांना दीपावली उत्सवानिमित्त त्यांच्या पसंतीचे आणि आवडीचे कपडे मान्यवरांच्या हस्ते विशेष भेट म्हणून देण्यात आले.

'दीपावली विशेष' या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अगस्ती पतसंस्थेचे माजी चेअरमन बाळासाहेब भोर होते. व्यासपीठावर व्ही. पी. फूड्सचे संचालक राजेश पाडेकर, प्रसिद्ध लोकशाहीर मुकुंदा भोर, त्यांच्या पत्नी श्वेताली भोर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका कार्यवाह किशोर टेंके, अनुलोमचे तालुका प्रमुख रोहित चोथवे, दूधगंगा पतसंस्थेचे माजी कार्यकारी संचालक अशोक शिंदे, दिलीप मंडलिक आणि श्री समर्थ सेवा ट्रस्टच्या अध्यक्ष रूपाली रेणुकदास उपस्थित होते.

सुशांत गजे म्हणाले की, समाजात अनेक प्रश्न आहेत; मात्र एखादा विषय हाती घेऊन त्यासाठी वेळ देत सातत्याने काम करणे महत्त्वाचे आहे. अहिल्या एकल समिती हे काम करीत आहे. दिवाळी कपडे वितरणाचा हा आगळावेगळा उपक्रम असून, वंचितांच्या जीवनात खऱ्या अर्थाने आनंद निर्माण करणारा आहे. समाजात अनेक श्रीमंत लोक असतानाही ते पुढे येत नाहीत, मात्र रेणुकदास दाम्पत्य एकल महिलांसाठी करीत असलेले काम कौतुकास्पद आहे.

बाळासाहेब भोर म्हणाले की, अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समिती गेल्या काही वर्षांपासून एकल महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी अकोल्यात कार्यरत आहे. रविवारची शाळा हा त्यांचा उपक्रम समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.

यावेळी मुकुंदा भोर, दिलीप मंडलिक, राजेश पाडेकर आणि किशोर टेंके यांनीही मनोगते व्यक्त केली. श्रीनिवास रेणुकदास यांनी प्रास्ताविक केले, तर अशोक शिंदे यांनी स्वागत केले.

या उपक्रमातून अकोले शहरातील एकल महिलांच्या सुमारे १२५ मुलांना दिवाळीचे कपडे भेट देण्यात आले. यावेळी अहिल्या एकल भवनच्या सिंधू धोंगडे, नीलिमा नवले, पूनम रूपवते, जोशना देशमुख, तुकाराम कोकतरे यांच्यासह एकल महिला आणि त्यांची मुले उपस्थित होती.

या उपक्रमासाठी अगस्ती कारखान्याचे संचालक विकास शेटे, पराग वाडगे, मेजर नारायण उगले, मुकुंदा भोर, सुशांत गजे, डॉ. संतोष तिकांडे, वसंत बाळसराफ, अशोक गायकवाड, दिलीप मंडलिक, ॲड. बाळासाहेब वैद्य, अनंत घाणे, बाळासाहेब पवार आणि मनोज गायकवाड यांच्या विशेष योगदानातून एकल महिलांच्या मुलांना दिवाळीची भेट देण्यात आली.

वीरभूमी

‘आमच्याकडे पैसेच नाहीत’... सार्थकच्या उत्तराने पालकमंत्रीही हेलावले!

दुष्काळग्रस्त कळसपिंपरीत मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांची दिवाळी । विद्यार्थ्यांना फराळ, फटाके वाटप

● पाथर्डी । वीरभूमी –

‘घरी दिवाळीचा फराळ केला का? नवे कपडे, फटाके आणले की नाही?’ या प्रश्नांना कळसपिंपरी येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी मूकपणे नकारार्थी उत्तरे दिली. एका विद्यार्थ्याला जवळ घेऊन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुन्हा तेच प्रश्न विचारले. त्यावेळी अत्यंत निरागसपणे हातवारे करत सार्थक राठोड या विद्यार्थ्याने बोबड्या बोलांत, ‘आमच्याकडे पैसेच नाहीत,’ असे उत्तर दिले. त्याच्या या उत्तराने दुष्काळाची तीव्रता बालमनावर किती खोलवर रुजली आहे, याची जाणीव उपस्थितांना झाली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार मोनिका राजळे यांनी विद्यार्थ्यांना फटाके, फळे आणि फराळाचे साहित्य दिल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार प्रत्येक मंत्र्यांनी टंचाईग्रस्त भागात दिवाळी साजरी करून नागरिकांना दिलासा द्यावा, असे आवाहन करण्यात आले होते. टंचाईच्या परिस्थितीत शासन सर्व पातळ्यांवर सक्रिय असून नागरिकांनी घाबरून जाऊ नये, यासाठी संवाद साधण्याची भूमिका सरकारने घेतली आहे.

त्यानुसार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शनिवारी सायंकाळी कळसपिंपरी येथे विद्यार्थी, ग्रामस्थ आणि महिलांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. भीमसेन भवार यांच्या घरी जाऊन त्यांनी स्वतः पणती पेटवली. दुष्काळी संकटाने चिंताग्रस्त झालेल्या कुटुंबाला सहानुभूतीच्या शब्दांत धीर दिला. तेथेच पिठलं-भाकरीचे जेवण करत सुख-दुःखाच्या गप्पा मारल्या. या दौऱ्यामुळे दुष्काळग्रस्त ग्रामस्थांना दिलासा मिळाल्याचे आणि त्यांच्या मनावरील ताण काहीसा हलका झाल्याचे चित्र दिसून आले.

यावेळी आमदार मोनिका राजळे, प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, गटविकास अधिकारी राजेंद्र धस, वृद्धेश्वरचे संचालक राहुल राजळे, अजय रक्ताटे, संभाजी वाघ, दिगंबर भवर, कार्यकर्ते, प्रमुख अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संपूर्ण टंचाईग्रस्त भागातील नागरिकांशी एकाच वेळी संवाद साधणे शक्य नसल्याने प्रातिनिधिक स्वरूपात टंचाईग्रस्त कुटुंबांसोबत दिवाळी साजरी करून नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी विखे पाटील यांनी जायकवाडी योजनेसह पाणीटंचाई, चारा परिस्थिती आणि जलसंधारणाचा आढावा घेतला. राक्षी येथील जलशुद्धीकरण केंद्रावरील यंत्रणा त्वरित कार्यान्वित करण्याचे आदेश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

संकटाच्या प्रसंगी राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. हा विश्वास देण्यासाठी कळसपिंपरी येथे दिवाळी साजरी करून संवाद साधल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. गणेशनगर तांडा येथेही मान्यवरांनी फराळ आणि फटाके वाटून रहिवाशांशी संवाद साधला.

पालकमंत्र्यांच्या दौऱ्यामुळे विविध सोडवणुकीला गती मिळाली. बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यांच्या हद्दीवरील घाटशील पारगाव मध्यम प्रकल्पाच्या बीड जिल्ह्यातील भागात चारा उत्पादनाचा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबत विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी तातडीने चर्चा करून प्रश्न सोडवला. त्यामुळे तालुक्याच्या पूर्व भागातील चारा समस्या काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. प्रश्नांचे गांभीर्य आणि गरज ओळखून जागेवर निर्णय घेण्याच्या कार्यपद्धतीमुळे सणासुदीच्या अचानक प्रश्नांच्या दिवसांतही प्रशासकीय यंत्रणा सक्रिय झाल्याचे दिसून आले.

सार्थकच्या वेदना समजून घेण्याची गरज

■ ‘आमच्याकडे पैसेच नाहीत,’ असे उत्तर देणाऱ्या सार्थकच्या वडिलांचे काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले आहे. कष्ट करून जगताना कुटुंबाची होणारी घालमेल बालमनाला सुन्न करणारी ठरली आहे. कुटुंबात पैसे नसणे हेच सर्व समस्यांचे कारण असल्याचा निष्कर्ष या बालकाने काढला. त्याचे बोबडे बोल ऐकून उपस्थितांनाही दुष्काळाची दाहकता अधिक तीव्रतेने जाणवली. ज्या कुटुंबात जेवण केले, त्या कुटुंबातील तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न आणि सार्थक राठोडसारख्या कुटुंबांना सक्रियपणे भरीव मदत मिळाली, तर विखे-राजळे यांच्या दौऱ्याचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल.

ज्ञानदीप प्रतिष्ठानकडून १५० कुटुंबांची दिवाळी गोड!

चिल्हारवाडी व आंबवाचीवाडीत फराळ वाटप । २५ ज्येष्ठ महिलांना भाऊबीजेची म्हणून नऊवारी साड्यांची भेट

● अकोले । वीरभूमी–

दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि माणुसकीच्या नात्यांचा सण! हा आनंद केवळ शहरांपुरता मर्यादित न ठेवता दुर्गम भागातील कुटुंबांपर्यंत पोहोचविण्याच्या भावनेतून ज्ञानदीप प्रतिष्ठान, अकोले यांच्या वतीने चिल्हारवाडी व आंबवाचीवाडी (शिरपुंजे) येथील १५० कुटुंबांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. प्रतिष्ठानच्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीच्या नात्यांचा सुंदर प्रत्यय आला.

प्रत्येक कुटुंबाला लाडू, शंकरपाळी, फरसाण, बर्फी आणि सोनपापडी अशा विविध पदार्थांचा दीड किलोचा फराळ भेट देण्यात आला. दुर्गम भागातील कुटुंबांचाही दिवाळीचा आनंद द्विगुणित व्हावा आणि त्यांच्या घरातही सणाचा गोडवा पोहोचावा, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. देण्याच्या आनंदातून माणुसकीचे नाते अधिक घट्ट करण्याचा प्रतिष्ठानचा हा प्रयत्न ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर समाधान फुलवणारा ठरला.



वाटप कार्यक्रमाला व्यासपीठावर भानुदास आभाळे, डॉ. महादेव अरगडे, भाऊसाहेब कासार, सखाराम तळपाडे, सुखदेव इल्हे, सुनील शेळके, नामदेव सोंगाळ, संतोष शेळके आणि भूपाल शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

या सामाजिक उपक्रमासाठी जोगेश शर्मा, सुरेश चंद्रशेखरन, अण्णासाहेब वाजे, मोहन नायर, प्रेमलता बद्रीनाथ, शकुंतला धुमाळ, भक्ती साबळे, सुनीता आभाळे, आशुतोष थिटे, संगीता वांजेकर, आदित्य कोकणे, वैष्णवी दिघे, दिविशा रोहतगी, प्रथमेश लगड, अनिल पवार, पवार यांनी आभार मानले.

नुपूर करंडे, विजया जोशी, स्नेहल नवले, प्रसाद चासकर आणि संगीता वंडेकर यांच्यासह इतर दानशूर व्यक्तींचे आर्थिक सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे हा स्नेहाचा उपक्रम प्रत्यक्षात साकारता आला.

उपक्रमाच्या यशस्वितेसाठी मानसी कासार, पंकज आवारी, अधिश पवार, निखिल शेळके, शिवम सहाणे, वेदांत कासार, प्रांजली धुमाळ, ऋतुजा भोर, शामली वैद्य आणि सिद्धी नेहे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजली धुमाळ यांनी केले, तर अधिश प्रेरणादायी आदर्श ठरला.

दिवाळीच्या प्रकाशाला माणुसकीच्या स्नेहाची जोड मिळाली, तर सणाचा खरा आनंद द्विगुणित होतो. चिल्हारवाडी आणि आंबवाचीवाडीतील कुटुंबांपर्यंत पोहोचलेली फराळाची भेट म्हणजे केवळ खाद्यपदार्थांचे वाटप नव्हते, तर आपुलकी, जिव्हाळा आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारी स्नेहाची ओंजळ होती. याशिवाय २५ कुटुंबांतील ज्येष्ठ महिलांना भाऊबीज म्हणून नऊवारी साड्यांचे वाटप करण्यात आले. ज्ञानदीप प्रतिष्ठानचा हा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचा

निविदेतील त्रुटी दाखवल्याने शेवगावात पालिका कर्मचाऱ्याला मारहाण

नगरसेविकेचे पती नंदकुमार मुंढे यांच्याविरोधात गुन्हा दाखल

● शेवगाव । वीरभूमी–

नगरपरिषदेच्या सुमारे दहा लाख रुपये किमतीच्या विद्युत साहित्य खरेदीच्या निविदा प्रक्रियेतील गंभीर तांत्रिक त्रुटी निदर्शनास आणून दिल्याचा राग मनात धरून पालिका कर्मचाऱ्याला कार्यालयात घुसून मारहाण केल्याचा प्रकार घडला. या प्रकरणी नगरपरिषदेतील लिपिक केतन वसंत मुरदारे (वय ३१, रा. शेवगाव) यांच्या फिर्यादीवरून नगराध्यक्षांचे दीर आणि नगरसेविकेचे पती नंदकुमार उत्तमराव मुंढे यांच्याविरोधात शेवगाव पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा आणणे, जीवे मारण्याची धमकी देणे यासह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत म्हटले आहे की, नगरपरिषदेने सुमारे दहा लाख रुपये किमतीच्या विद्युत साहित्य खरेदीसाठी निविदा प्रसिद्ध केली होती. या प्रक्रियेत तीन एजन्सींनी निविदांमध्ये गंभीर तांत्रिक त्रुटी आढळल्याने लिपिक मुरदारे यांनी संबंधित ठेकेदारांना शासकीय ई-मेलद्वारे याबाबत कळविले. त्यामुळे ठेकेदार नाराज झाले होते.

या तिन्ही निविदा नंदकुमार मुंढे यांच्या निकटवर्तीयांनी वेगवेगळ्या नावांनी भरल्याचा आरोप आहे. संबंधित काम आपल्या मर्जीतील ठेकेदारालाच मिळावे, यासाठी मुरदारे यांच्यावर दबाव आणला जात होता. मात्र, निविदा प्रक्रियेतील तांत्रिक बाबींची पूर्तता करण्याची भूमिका मुरदारे यांनी घेतली होती.

दरम्यान, ३ नोव्हेंबर रोजी मुरदारे नगरपरिषद कार्यालयात शासकीय कामकाज करीत असताना नगराध्यक्षांचे पती अरुण मुंढे यांनी त्यांना फोन केला. निविदा प्रकरणावरून जाब विचारत दबाव आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी नंदकुमार मुंढे यांनीही फोनवरून ‘आता तुला मी माझ्या पद्धतीने बघतो,’ अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

यानंतर काही वेळातच नगरपरिषदेच्या पहिल्या मजल्यावरील मीटिंग हॉलमध्ये सहभाग घेतला होता. मात्र, तिन्ही मुरदारे मुख्याधिकाऱ्यांशी फोनवर शासकीय कामकाजाबाबत चर्चा करीत होते. फोन संपवून बाहेर पडत असताना नंदकुमार मुंढे आणि त्यांचे दोन साथीदार हॉलमध्ये घुसले. त्यांनी मुरदारे यांना ‘तू आमच्या माणसाला जातीवाचक शिवी का दिली?’ असा जाब विचारत कानशिलात जोरदार चापट मारली.

हॉलमध्ये आरडाओरडा ऐकून नगरपरिषदेचे लेखापरीक्षक आणि अधिकारी-कर्मचारी मदतीसाठी धावून आले. त्यांनी वाद मिटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतरही नंदकुमार मुंढे यांनी कर्मचाऱ्यांना धमकावत मुरदारे यांना दमदाटी करून मारहाण केल्याचा आरोप आहे.

या प्रकारामुळे नगरपरिषदेतील शासकीय कामकाज पूर्णपणे ठप्प झाले. त्यानंतर मुरदारे आणि इतर कर्मचाऱ्यांनी पोलीस ठाणे गाठले. काहींनी मध्यस्थी करून प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुसऱ्या दिवशी लिपिक केतन मुरदारे यांनी नंदकुमार मुंढे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रामहारी खेडकर करीत आहेत.

मेक्सिकोच्या प्राध्यापिका व विद्यार्थ्यांची पाथर्डीतील शाळेला भेट

भारत-मेक्सिको शैक्षणिक मैत्रीचा सेतू । पीएमश्री जिल्हा परिषद शाळेत उत्साहात स्वागत

● पाथर्डी । वीरभूमी–

जागतिकीकरणाच्या युगात विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक अनुभवाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शहरातील श्री तिलोक जैन विद्यालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अमेरिकन सरकारच्या फुलब्राइट शिष्यवृत्तीअंतर्गत भारत, अमेरिका आणि मेक्सिको यांच्या संयुक्त शैक्षणिक सहकार्यांतर्गत मेक्सिकोतील वादालाहारा विद्यापीठासोबत झालेल्या सामंजस्य करारानुसार आंतरराष्ट्रीय विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांतर्गत मेक्सिकोतील वादालाहारा विद्यापीठाच्या प्राध्यापिका डॉ. सॅन्ड्रा कॅस्ट्रो यांच्यासह ब्रायना इबारा, डॅरियन कोरोना, रेनाटा गोंझेलेझ, मिशेल रोजस आणि लन गुटेरेझ हे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या कार्यक्रमातून ज्ञान, विज्ञान, संस्कृती, शिक्षणपद्धती आणि सामाजिक जीवनाबाबत विचारांची देवाणघेवाण होणार आहे.

याशिवाय परिसरातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळे, विविध शैक्षणिक संस्था आणि शाळांना भेटी देऊन मेक्सिकोच्या पाहुण्यांना भारतीय इतिहास, परंपरा, संस्कृती आणि सामाजिक जीवनाचा जवळून परिचय करून दिला जाणार आहे.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष आंतरराष्ट्रीय संवादाचा अनुभव मिळणार आहे. विविध देशांतील भाषा, संस्कृती, शिक्षणपद्धती आणि जीवनशैली समजून घेताना विद्यार्थ्यांमध्ये जागतिक दृष्टिकोन, संवादकौशल्य, सांस्कृतिक समन्वय आणि आंतरराष्ट्रीय मैत्रीची भावना विकसित होण्यास मदत होणार आहे. विशेषतः पाथर्डीसारख्या निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना परदेशी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसोबत शिकण्याची, संवाद साधण्याची व विचार मांडण्याची संधी मिळणे मोलाचे ठरणार आहे.

मेक्सिकोच्या पाहुण्यांचे शहरातील पीएमश्री जिल्हा परिषद शाळेत उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने परदेशी पाहुण्यांशी संवाद साधला. पाहुण्यांना शाळेत पाहून चिमुकले विद्यार्थी हरखून गेले. त्यांनी उत्सुकतेने पाहुण्यांना प्रश्न विचारले, तर पाहुण्यांच्या प्रश्नांना तितक्याच आत्मविश्वासाने उत्तरे दिली.

तालुका शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, केंद्रप्रमुख सविता कुटे, मुख्याध्यापिका नंदा तुपे, शिक्षिका छाया चंदनशिव, सुरेखा बडे, भावना देवरे, ज्योती जाधव, मनीषा फटांगरे, कविता शिरसाट, मंदा पालवे आणि सूर्यकांत काळोखे यांनी पाहुण्यांचे सहर्ष स्वागत केले.

यावेळी परदेशी पाहुण्यांनी भारतातील प्राथमिक शिक्षणपद्धती, शाळा, शालेय व्यवस्थापन, अभ्यासक्रम, भौतिक सुविधा आणि शैक्षणिक गुणवत्ता यांची माहिती घेतली. पाथर्डीच्या शैक्षणिक भूमीवर साकारत असलेला हा भारत-मेक्सिको मैत्रीचा उपक्रम म्हणजे ज्ञानाची देवाणघेवाण, संस्कृतींचा संगम आणि जागतिक बंधुभावाचा सुंदर आविष्कार ठरत आहे.

